# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०१ १०१


## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/३७७/२०२५-२६ दि१५/१२/२०२५

प्रति.,
सिस्टीम मॅनेजर,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषयः- **जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा-भाईंदर सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ च्या अनुषंगाने होर्डिंगवरील राजकीय व इतर जाहीराती बाबत जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेस मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तरी सदर जाहिर प्रकटन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावे.

**सोबत :-** जाहिर प्रकटन प्रत.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत :-

१. मा.आयुक्त सो.
२. मा.अतिरीक्त आयुक्त (निवडणूक)

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०१ १०१

## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/३७५/२०२५-२६ दि. २५/१२/२०२५

## // जाहीर प्रकटन //

**विषय :- मिरा-भाईंदर सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ च्या अनुषंगाने होर्डिंगवरील राजकीय व इतर जाहीराती बाबत.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या रानिआ/ मनपा-२०२५ /प्र.क्र. ८०/का-५ दि.१५ डिसेंबर २०२५. रोजीचे आदेशानुसार मिरा-भाईंदर सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ ची आदर्श आचारसंहिता लागु झालेली आहे. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका जाहीरात विभागामार्फत खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर ठेक्याने उभारलेल्या होर्डींग इत्यादींवर निवडणूक कालावधीत राजकीय व इतर जाहीरात प्रसिध्द करावयाची असल्यास एजन्सी/व्यक्ती/संस्था यांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व महानगरपालिका जाहिरात विभागाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

ज्या होर्डीगधारकांची मागील व चालु सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जाहीरात फी थकित असेल अशा होर्डीगधारकांनी त्वरीत जाहीरात फीचा भरणा करावा. जाहिरात प्रसिध्द करावयाची असल्यास समन्यायिक व चक्राकार (रोटेशन) पद्धतीने प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य संबंधित कार्यक्षेत्रातील निवडणुक निर्णय अधिकारी व महानगरपालिका जाहिरात विभागाची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगीनंतरच राजकीय अथवा इतर जाहीराती प्रसिध्द कराव्यात.

ज्या होर्डीगधारकांना परवानगी नसेल व मागील व चालु सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षातील जाहीरात फी थकित आहे, त्यांनी जाहीरात प्रसिध्द केल्यास आचारसंहितेचा भंग समजून होर्डींग मालकावर गुन्हा दाखल करून होर्डींग जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका